**—: नि.दि.मु.क्र. ०१/२००७ मधील निशाणी १४७ वरील आदेश :—**

याकामी वादीचा पुरावा संपलेला असून प्रतिवादीचा पुरावा सुरु झालेला आहे. त्यानंतर दाव्यात दुरुस्ती करण्यात आली. त्या दुरुस्तीच्या अनुषंगाने वादीला अधिक सरतपास घेण्यास परवानगी मिळावी यासाठी वादीचा अर्ज आहे.

०२. सदरच्या अर्जाला प्रतिवादीने विरोध दर्शविला आहे. त्यांचे असे कथन आहे की वादीचा पुरावा संपला असून प्रतिवादीचा पुरावा सुरु झालेला आहे. अर्ज बेकायदेशीर आहे. सबब तो फेटाळण्यात यावा.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संचिकेचे अवलोकन केले. दाव्यात दुरुस्ती झाल्यानंतर त्या वादकथनांच्या अनुषंगाने वादीला अधिक पुरावा देण्यास संधी देणे न्यायोचित होणारे आहे. निव्वळ वादकथन हा पुरावा होवू शकत नाही. वादीच्या अधिक सरतपसाच्या अनुषंगाने उलट तपास घेण्याची संधी प्रतिवादीला मिळणार आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात येतो.

सही/—

मालवण, (संतोष द. चव्हाण )

दिनांक : २९/०२/२०१६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मालवण.